**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारकडून साखरेच्या निर्यातीवर तात्काळ प्रभावाने बंदी

- आयात केलेल्या खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी पामतेल तसंच सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा आणि मोहरीच्या तेलाच्या वापराला राज्य सरकारचं प्राधान्य

- राज्यातल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक असलेली नंबर प्लेट १ जुलैपासून अनिवार्य

- राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार

**आणि**

- नीट पेपर फुटीप्रकरणी लातूरमधून निवृत्त प्राध्यापकाला अटक, पुण्यातूनही दोघे अटकेत

**<><><><><>**

केंद्र सरकारनं साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली असून यामध्ये कच्च्या, पांढऱ्या आणि शुद्ध साखरेचा समावेश आहे, ही बंदी तात्काळ प्रभावानं सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील सूचना येईपर्यंत लागू असेल. साखरेचा देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करणं आणि स्थानिक किमतींवर नियंत्रण ठेवणं हा यामागचा उद्देश आहे. मात्र युरोपियन युनिअन आणि अमेरिकेसाठी काही विशिष्ट कोट्याकरता  अपवाद  असून केवळ त्यासाठी साखरेची निर्यात केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे सध्या प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेत असलेल्या मालाला देखील यातून सूट देण्यात आली आहे.

**<><><><><>**

आयात केलेल्या खाद्य तेलाचा वापर कमी करण्यासाठी राज्य सरकारकडून पामतेल तसंच सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा आणि मोहरीच्या तेलाच्या वापराला शासकीय उपहारगृह, अंगणवाडी, रुग्णालयं आणि वसतिगृहांमध्ये प्राधान्य दिलं जाणार आहे. यासाठी मेन्यूतही बदल केला जाणार आहे. काटकसर आणि इंधन बचतीसाठी सरकारनं काल प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात हे आदेश नमूद आहेत. कोणत्याही कारणांसाठी बाइक रॅली, वाहनांच्या मिरवणुकांना पोलिसांनी परवानगी देऊ नये असे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. याविषयी मुख्यमंत्री म्हणाले..

**होल्ड.. बाईट - फडणवीस (१३ सेकंद)**

मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये रेस्टॉरंट आणि हॉटेलांमध्ये पीएनजीचा वापर बंधनकारक केला आहे. तसंच प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतल्या दुबार नोंदी काढण्याचे आदेशही सरकारनं दिले आहेत. गैरशेती वापरासाठी युरियाचा गैरवापर रोखण्याचे आदेशही सरकारनं दिले आहेत. खतांचा तर्कसंगत वापर करण्यासाठी कृषी विभागानं माती परीक्षणाची मोहिम राबवावी असंही या परिपत्रकात नमूद आहे. शासकीय जाहिरातींसाठी अनावश्यक खर्च टाळावा तसंच सजावटीचे दिवे, फ्लेक्स, बॅनर, यांच्या कमीत कमी वापर करावा. डिजिटल फ्लेक्ससाठी जनरेटर वापरु नये असंही सरकारनं म्हटलं आहे. सर्व प्रशासकीय विभागांनी ६ महिन्यांसाठी सल्लागारांची नियुक्ती करु नये अशे निर्देशही या परिपत्रकात नमूद आहेत.

**<><><><><>**

पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्याच्या सुधारित धोरणाला आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. यानुसार सहा मोठ्या प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यात येणार असून हा गाळ शेतकऱ्यांना वाटण्यात येणार आहे. यामुळे धरणातला पाणीसाठा वाढेल शिवाय शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होईल. हा गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य उपलब्ध करून दिला जाणार असून त्यांना केवळ वाहतुकीचा खर्च करावा लागणार आहे.

**वय,** शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेला बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातल्या उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार असून त्यांना खुल्या प्रवर्गातल्या जागेवर दावा सांगता येणार नाही, असा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला. यामुळे आरक्षणाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता येईल असं सांगितलं जात आहे.

**मृद** आणि जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करायला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून राज्यातल्या ८ हजार ७६७ पदांना मान्यता देण्यात आली आहे. नाशिक इथल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठान संस्थेला दरवर्षी दहा लाख रुपये अनुदान देण्यासह इतर निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाले.

**<><><><><>**

राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' यांच्यात आज १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार आज झाला. या प्रकल्पामुळे उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे.

<><><><>

राज्यातल्या वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी येत्या १ जुलैपासून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसवणं अनिवार्य असून त्यासाठी राज्य सरकारनं वाहनधारकांना ३० जून पर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या नियमाचं उल्लंघन केल्यास एक हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशानं राज्य सरकारनं १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसवणं अनिवार्य केलं आहे.

<><><><>

राज्य सरकारनं विदर्भातल्या साडे पाचशे किलोमीटरच्या महामार्गांना आज मंजुरी दिली. नागपूर – गोंदिया, भंडारा- गडचिरोली, नागपूर-चंद्रपूर आणि नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड असे हे द्रुतगती मार्ग आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत डिसेंबर २०२८ पर्यंत हे महामार्ग पूर्ण करण्याचं नियोजन आहे.

<><><><>

राज्यात मतदार यादीच्या SIR अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं आज १६ राज्य आणि ३ केंद्र शासित प्रदेशातल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार राज्यात ३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान हरकती दाखल करता येतील. या हरकतींवर ३ ऑक्टोबरपर्यंत सुनावणी होऊन निकाल दिले जातील आणि ७ ऑक्टोबरला राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. १ ऑक्टोबरपर्यंत वयाची १८ वर्ष

पूर्ण करणाऱ्या नागरिकांची नावं या मतदार यादीत समाविष्ट होतील. राज्यात सध्या ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांची नोंद आहे.

<><><><>

जनगणना प्रगणक म्हणून नियुक्ती केलेल्या धुळे इथल्या तीन शिक्षिका जनगणनेच्या प्रशिक्षणाला गैरहजर राहिल्यानं त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरमधून एका निवृत्त प्राध्यापकालाही अटक केली आहे. पी. व्ही. कुलकर्णी लातूरच्या दयानंद महाविद्यालयात कार्यरत होते. नीट परीक्षेचा रसायनशास्त्राचा पेपर तयार करण्याच्या प्रक्रियेत ते सहभागी होते. सीबीआयनं ही अटक केली आहे.

याप्रकरणी पुण्यातून एका महिला आणि एका विद्यार्थ्याला अटक झाली आहे. नीटच्या पेपरची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्याला शोधणं, त्याच्याकडून पैसे घेणं आणि त्याला पेपर विकणाऱ्या दलालापर्यंत पोहोचवणं ही कामं हे दोघं करत असल्याचा त्यांच्यावर संशय आहे.

<><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार तेजी दिसून आली. दूरसंचार, औषधी आणि खासगी बँकांच्या समभागांमध्ये खरेदी झाल्यानं ही तेजी दिसून आली. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ७९० अंकांची वाढ झाली आणि तो  ७५ हजार ३९९ अंकावर बंद झाला. निफ्टीही २७७ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ६९० अंकांवर बंद झाला. रुपयाची कमजोरी थांबवण्यासाठी सरकारनं योजलेल्या काही उपाययोजनांमुळंही बाजारात तेजी दिसून आली.

दरम्यान, महानगर गॅसनं मुंबईत सीएनजीचे दर २ रुपयांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासून नवीन दर लागू झाले असून १ किलो सीएनजीसाठी आता ८४ रुपये मोजावे लागतील. पीएनजीच्या दरात कुठलाही बदल झालेला नाही.

<><><><>

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. या मार्गाचा व्यापक पुनर्विकास करण्यात आला असून, तो आता पूर्णत्वाच्या जवळ पोहोचला आहे. त्यामुळे आता पंढरपूर वारी ही अधिक सोईची आणि  प्रशस्त होणार आहे, असं गडकरी म्हणाले. पालखी महामार्गावरची उर्वरित कामं  तात्काळ पूर्ण करण्यात येतील तसंच रेल्वे

प्रशासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर वाखरी ते पंढरपूर रस्त्याचं काम तात्काळ पाठपुरावा करून कामं मार्गी लावण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात आंबा-काजू नुकसानाचे पंचनामे करण्याचं काम युद्धपातळीवर सुरु असून कोणताही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी १९ मेपर्यंत आपल्या भागातल्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रं जमा करावीत, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**<><><><><>**

कुस्तीपटू खाशाबा जाधव यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्कार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवल्याचं प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात सादर केलं आहे. या संबंधीची जनहित याचिका कुस्तीवीर खाशाबा जाधव फाऊंडेशनने दाखल केली आहे.

**<><><><><>**

देशातला घाऊक किंमतीवर आधारित चलनवाढीचा निर्देशांक एप्रिल अखेर ४२ महिन्यातल्या उच्चांकी, ८ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांवर पोहोचला आहे. मार्च महिन्यात हा निर्देशांक ३ पूर्णांक ८८ दशांश टक्के होता. खनिज तेल, पेट्रोलियम पदार्थ, नैसर्गिक वायू, धातू आणि खाद्यान्नाच्या व्यतिरीक्त इतर वस्तूंच्या किंमती वाढल्यानं या निर्देशांकात ही वाढ झाली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात लढत होणार आहे. हिमाचल प्रदेशातल्या धरमशाला इथं संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होणाऱ्या या सामन्यात मुंबईनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

सीबीआयने आज अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या एका तक्रारी संदर्भात मुंबई, गुरुग्राम आणि बंगळुरू या तीन शहरांमधल्या एकूण सात ठिकाणांवर छापे टाकले. या छाप्यात काही कागदपत्रं जप्त करण्यात आली असून पुढचा तपास सुरू आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१७ मे २०२६ - गुरुवार

**//<><><><><>//**